**दि.09.03.2026**

**कृषी विज्ञान केंद्र धुळे येथे दोन दिवसीय व्यवसायिक शेळीपालन या विषयावर प्रशिक्षण उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न**....

महात्मा फुले कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र, धुळे व आत्मा, धुळे यांचे माध्यमातून शेतकरी, पशुपालक, महिला, युवकांसाठी दोन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण संपन्न. सदर प्रशिक्षण उदघाटन कार्यक्रम डॉ. राहुल देसले, प्राध्यापक, पशु संवर्धन व दुग्ध शास्त्र विभाग, कृषी महाविद्यालय, धुळे, डॉ. दिनेश नांद्रे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, डॉ.पंकज पाटील, शास्त्रज्ञ,पिक सरंक्षण, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, डॉ.पंकज देवरे, सहायक प्राध्यापक, कृषी महाविद्यालय, धुळे, डॉ.अतिश पाटील, शास्त्रज्ञ, मृद विज्ञान, कृषी विज्ञान केंद्र, धुळे , डॉ धनराज चौधरी, शास्त्रज्ञ, पशु संवर्धन व दुग्ध शास्त्र, कृषी आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक डॉ.दिनेश नांद्रे यांनी केले, प्रास्तविका मध्ये त्यांनी प्रशिक्षणाचा उद्देश सांगत, कृषी बरोबर कृषी पूरक व्यवसाय यामध्ये पशुसवंर्धन करत असताना युवकांचे, महिलांचे योगदान कसे महत्वाचे आहे हे अधोरेखित करत शेळी पालनाचे महत्व याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ.राहुल देसले, यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थे मधील शेलीपालनाचे महत्व अधोरेखित करत उपस्थित प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले तसेच जास्तीत जास्त महिला पशुपालाकांनी शेतकरी प्रशिक्षणा मध्ये सहभाग नोंदवत शेलीपालानातील शास्त्रीय बाबी समजून घेवून नियोजन करण्याचे आव्हान केले.

सदर दोन दिवसीय तांत्रिक चर्चा सत्रामध्य डॉ. प्रमोद साखरे, डॉ.धनराज चोधरी, डॉ. विशाल पवार यांचे मार्गदर्शन लाभले यात प्रामुख्याने शेळी पालन व्यवसायाची ओळख, शेळीपालन कशाकरिता, शेळीपालनाचे फायदे, भारतातील/महाराष्ट्रतील शेळयांच्या जाती व त्यांचे वैशिष्टे, शेळीपालनाच्या पद्धती, शेळयांच्या कारदांचे संगोपन व आहारव्यवस्थापन इत्यादी, शेळयांचे निगा, आहार व्यवस्थापन, नर निगा, आहार व्यवस्थापन, पशु पैदास धोरण, शेळयांची निगा लसीकरण व रोग व्यवस्थापन, दुध व मांस खरेदी विक्री व्यवस्थापण, विविध शासकीय योजना माहिती, प्रकल्प अहवाल तयार करावयाची माहिती, गट शेती संकल्पना व महत्व, इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रशिक्षणा दरम्यान कृषी विज्ञान केंद्र, धुळे प्रक्षेत्रावरील शेळी पालन युनिट व चारा पिक संग्रहालय प्रक्षेत्र भेटीचे नियोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षणाचे संपूर्ण संचालन संयोजन डॉ.धनराज चौधरी व आभार डॉ. पंकज पाटील व डॉ. अतिश पाटील यांनी केले. प्रशिक्षण यशस्विते साठी श्री.जगदीश काथेपुरी, श्री.रोहित कडू, श्रीमती.अमृता राउत, कु.प्राची काळे, कु.स्वप्नाली कौटे, श्री.स्वप्नील महाजन, श्री.बाळू वाघ, श्री.रमेश शिंदे श्री.कुमार भोये,श्री.मधुसूदन अहिरे, श्री.कुणाल राजळे, श्री. जीवन राणे इ. कृषी विज्ञान केद्र धुळे अधिकारी कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

